आजचा दिनविशेष
१९६८ : रिसर्च अँड अॅनालिसिस विंग (ठअथ) या भारतीय गुप्तचर संस्थेची स्थापना झाली.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २१ सप्टेंबर २०२५ | अंक २७२ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु



SUN Tourism INTERNATIONAL PVT. LTD. Since 2007 · All TOURS घर से घर तक · दिल से दिल तक · www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555


# जितका त्रास मराठ्यांना देणार तितका...

## मनोज जरांगेचा भुजबळांच्या वक्तव्यानंतर इशारा

### जितका त्रास मराठ्यांना दिला तेवढं मराठे खोलात घुसतील असा इशारा त्यांनी दिला

मंत्री छगन भुजबळ यांनी सध्या ओबीसी बचाव आरक्षण आणि मराठा आरक्षण जीआर रद्द करण्यासाठी रान पेटवलं आहे. ते ठिकठिकाणी त्यांची भूमिका जाहीर करत आहेत. सरकारमध्ये राहूनही त्यांचा सरकारवर विश्वास नसल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादीच्या चिंतन शिबिरानिमित्त भुजबळ नागपूरमध्ये होते. येथे त्यांनी ओबीसी समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न सुरु केल्याचे दिसले. आता समता परिषदेतंर्गत ओबीसी समाजाची एकजूट दाखवण्यात येणार आहे. गरज पडली तर दिल्लीपर्यंत लढा देण्याचा निर्धारही भुजबळांनी व्यक्त केला आहे. त्यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील (Manoj Jarange) यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. मराठा जीआरविरोधात मंत्री भुजबळांनी मोठी भूमिका घेतली. त्यांनी न्यायालयीन आयुधासह रस्त्यावरच्या लढाईचे सूतोवाच केले. राज्य सरकारच्याच भूमिकेविरोधात त्यांनी भूमिका घेतली आहे. मराठा जीआर हा ओबीसी आरक्षणाला धक्का देणार असल्याचा दावा त्यांनी केला. त्यावर भुजबळांना काय करायचं ते करुद्यात, त्याची काही



अडचण नाही. असे तुटक उत्तर जरांगे यांनी दिले. तर मराठे खोलात घुसतील यावेळी त्यांनी मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना सुद्धा थेट इशारा दिला. जितका त्रास मराठ्यांना दिला तेवढं मराठे खोलात घुसतील असा इशारा त्यांनी दिला. मराठ्यांनी कधी कुणाच्या आरक्षणाला विरोध केला नाही. पण मराठा समाजाच्या आरक्षणाला विरोध होत असेल तर मग मराठे पण त्याता उत्तर देणार हे जरांगे यांनी ठणकावले. चलो दिल्ली चा नारा दोन दिवसांपूर्वीच मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी दिल्लीकडे कूच करण्याचे सूतोवाच केले होते. ओबीसी प्रवर्गातूनच मराठा बांधवांना आरक्षणावर जरांगे ठाम आहेत. हैदराबाद गॅझेट आणि सातारा गॅझेटनुसार, राज्य सरकारने कुणबी नोंद असलेल्या मराठ्यांच्या कुणबी नोंद करायला सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काही मराठा बांधवांना याविषयीचे प्रमाणपत्रही देण्यात आले आहेत. तर दुसरीकडे हैदराबाद गॅझेटला विरोध करणाऱ्या काही याचिका कोर्टासमोर टिकल्या नाहीत. पण याप्रकरणात ओबीसी आणि मराठा समाजात कटुता आणण्याचे प्रयत्न होताना ही दिसत आहेत.

## बप्पा, आपण मुस्लिम समाजा सोबत मारल्या गप्पा :- शेख युनूस







बीड (प्रतिनिधी) बीड जिल्ह्यातील 99 टक्के मुस्लिम समाज आपल्या सोबत होता.पण तुम्ही त्यांना फक्त आश्वासनाच्या मारल्या गप्पा,पण आपल्याकडून समाजाची खूप आहे अपेक्षा ती आपण पूर्ण करावी. शहरात दोन-तीन दिवसाच्या पावसामुळे हाहाकार माजून मोमीनपुरा, बालेपिर परिसरात गोरगरिबांच्या घरात पाणी शिरले होते. आणि आपण शहरात दोन दिवस असून सुद्धा त्या भागातील गोरगरीब जनतेला भेटायला सुद्धा गेला नाहीत. ही खूप मोठी खंत आहे. ज्या मुस्लिम समाजाच्या लोकांनी कामे धंदे सोडून आपल्यासाठी जीवाचे रान केले.त्या समाजाला आपण विसरण्याचे काम आपण करीत आहात. साहेब नियमानुसार रेल्वे बोर्ड वर उर्दू भाषेत नाव लिहिणे बंधनकारक आहे. पण आपण जाणून बुजून याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे,असे जनतेकडून सांगण्यात येत आहे. तसेच मुस्लिम भागात रस्ते नाहीत,नाल्या नाहीत , खांबावर पथदिवे नाहीत, घंटागाडी येत नाही.आपण मुस्लिम लोकांना आश्वासन दिले होते, मी खासदार फंडातून मुस्लिम भागाचा विकास करेल, साहेब कुठे गेला विकास? आपण मुस्लिम समाजाकडे पाठ फिरवण्याचे काम करू नका, हीच मुस्लिम समाजाची इच्छा आहे.

## लुखेगाव जिल्हा परिषदे शाळेची समसम मिटली नवीन शिक्षक रुजू



माजलगाव प्रतिनिधी माजलगाव तालुक्यातील लुखेगाव येथे जिल्हा परिषद शाळा शिक्षकाची कमतरता असल्यामुळे विद्यार्थी ची तारामळ होत होती हे सगळे गोष्ट लक्षात घेऊन पत्रकार फेरोज खान इब्राहिम खा पठाण यांनी जिल्हा परिषद बीड व माजलगाव बि व ऑफिस येथे वारंवार निवेदन देऊन शिक्षकाची मागणी केली होती आखिर लुखेगाव जिल्हा परिषद शाळेला शिक्षक मिळाले नवीन शिक्षक दशरथ राजाराम सोळंके 19/09/2025 रोजी रुजू झाली जिल्हा परिषद शाळेचे व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष खंडू शेषराव कांबळे सर्व पालकाकडून आभार व्यक्त होत आहे

## बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालयाचे शालेय क्रीडा स्पर्धेत यश!

-येळंब(घाट) दिनांक 18 सप्टेंबर: नुकत्याच पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत मुलींच्या कुस्ती स्पर्धा प्रकारात बळवंतराव कदम माध्यमिक विद्यालयाने दैदिप्यमान यश संपादन करत जिल्हास्तरावर आपली निवड निश्चित केली आहे.

या बाबत अधिक माहिती अशी की, तालुकास्तरीय क्रिडास्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत बळवंतराव कदम विद्यालयाच्या 14 वर्ष वयोगटातील डोईफोडे ऋतुजा अश्रुबा हिने 46 किलो वजनी गटात. व जोगदंड शामल अप्पाराव हिने 50 किलो वजनी गटात तालुक्यातून प्रथम येत जिल्हास्तरावर आपली निवड निश्चित केली आहे. तर प्रशालेच्या 17 वर्षाखालील मुलींच्या



कुस्ती प्रकारात सानिका सुधीर पायाळ , समीक्षा बापुराव डोईफोडे,मुंडे शीतल लक्ष्मण ,तांदळे राधा बापुराव,सांगळे भक्ती नारायण , ढाकणे अक्षरा सुहास, व ज्ञानेश्वरी सुभाष शिंदे या विद्यार्थिनींनी तालुक्यातील सर्व प्रतिस्पर्धी संघावर मात करत जिल्हास्तरावर आपली निवड निश्चित केली आहे. प्रशालेने क्रिडा क्षेत्रातील दैदिप्यमान विजयाची यशस्वी परंपरा कायम राखत पुन्हा एकदा ग्रामीण भागातून बालाघाटावर सर्वोत्कृष्ट होण्याचा बहुमान मिळविला आहे. या घवघवीत यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक क्रीडा शिक्षक श्री मोहिते एम. व्ही., सहाय्यक क्रीडा शिक्षक श्री लहाने डी. एस.,श्री भोसले ए. एन. व श्रीमती गणगे. व्ही. एम. यांचे अभिनंदन व कौतुक श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री दिनकररावजी कदम साहेब यासह सर्व संचालक मंडळ , प्रशालेचे मुख्याध्यापक श्री राजकुमार कदम, पर्यवेक्षक श्री चौरे व्ही. एस. यासह सर्व प्राध्यापक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे.बालघटावर सातत्याने आपल्या गुणवत्ता आणि दर्जेदार व्यवस्थापन यासाठी प्रचलित शाळेचे व यशास्वितांचे याप्रसंगी या निकालाबाबत संपूर्ण पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक कौतुक व अभिनंदन केले आहे.

## ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत करा - अभिजीत पवार

बीड प्रतिनिधी - बीड जिल्ह्यात नव्हे महाराष्ट्रात गेल्या आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणामध्ये नुकसान झाले आहे. राज्य सरकारने शेतकऱ्यांना न्याय द्यावा. सतत गेल्यात आठ दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे या पावसाने शेतकरी अडचणी सापडला आहे. पावसाने शेतात आजही पाणी साचून शेतातील पीक पूर्णपणे कुजत आहे. नदीकाठावरील शेती तर पूर्णपणे खरडून गेली आहेत. शेतकऱ्यांच्या तोंडचा घास निघून गेला आहे, शेतकऱ्यांनी जगावं कसं, असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी अभिजीत पवार यांनी केली आहे. जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून परतीच्या पावसाने हजेरी लागली आहे. या झालेल्या मुसळधार पावसाने शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत.यामुळे शेती नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी, आणि ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी होत आहे. बीड जिल्हयात अनेक ठिकाणी सोयाबीन, कांदा, बाजरी , कपासी



इतर तरकारी पिकांमध्ये पाणी साठल्याने ही पिके पाण्यात बुडालेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना लाखोंचा फटका बसला आहे. मुसळधार पावसामुळे भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झाले. त्यात अधिक भर म्हणजे बाजारपेठेमध्ये दर कोसळल्याने शेतकऱ्यांना पावसाचा व दरांचा असा दुहेरी फटका बसत आहे. सोयाबीन पिकामध्ये पाणी साठल्याने सोयाबीन खराब होऊन कीड लागून खराब झाली आहे. परतीच्या पावसाने खरीप हंगामावर मोठे संकट ओढवले असून शेतकरी अक्षरशः उघड्यावर आले आहेत. दरम्यान प्रशासनाने या नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा द्यावा अशी मागणी अभिजीत पवार यांनी केली आहे.

## धनगर समाजाच्या एसटी आरक्षण साठी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी दिला पहीला पाठिंबा,

### धनगर समाजाचे माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे नेते आनंद काळे यांच्या शिष्टमंडळाला विद्यमान आमदारांनी दिले पाठिंब्याचे पत्र



बीड प्रतिनिधी अंकुश गवळी जालना येथे गेल्या चार दिवसापासून धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी दीपक बोराडे यांचे आमरण उपोषण चालू आहे यासंदर्भात माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपल्या पाठिंबाचे पत्र धनगर समाजाच्या शिष्टमंडळ यांना दिला आहे लवकरात लवकर धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करण्यात यावी अशी मागणी माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे, यावेळी सदर पत्र आनंद काळे व धनगर समाज बांधव जालना या ठिकाणी दीपक बोराडे यांना देण्यात आले आहे, यावेळी मराठा समाज बांधव देखील यामध्ये सहभागी होते,

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार, आरोपीला वडवणी पोलिसांनी ठोकल्या बेड्या

वडवणी/ प्रतिनिधी:-तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलगी ही आपल्या आजी आजोबाकडे राहते. दिनांक १४ सप्टेंबर रोजी आजी आणि आजोबा हे नातेवाईकाच्या मयतीला गेले असल्याने दुपारी मुलगी आणि तिचा लहान भाऊ घरी होते. घरी कोणीच मोठी व्यक्ती नसल्याचा फायदा घेत गावातीलच एका आरोपीने मुलीच्या घरामध्ये घुसून मुलीशी बळजबरी करू लागला तसेच मुलीला मोबाईल देतो आपण लग्न करू असे अमीश दाखवू लागला. मुलीने विरोधकेला असता मुलीला धमक्या देत अत्याचार केला. यावेळी मुलगी आणि तिचा लहान भाऊ दोघेच घरांमध्ये होते. आजी आजोबा महितीवरून घरी आल्यावर मुलीने झालेला प्रकार आपल्या आजोबांना सांगितला.

मुलीच्या आजी-आजोबांनी मुलीच्या आई-वडिलांना झालेल्या घटनेची माहिती देतात मुलीच्या आई वडील मुलीला वडवणी पोलीस स्टेशन ला घेऊन येत मुलीच्या जबाबदावरून गुरुवारी आरोपीविरुद्ध वडवणी पोलीस ठाण्यात कलम ६४, ६४ (२)(आय) (ज),७५,३५१(३) बी एन एस सह ४,८,१२ बालकांचे संरक्षण अधिनियम, ३(१) डब्लु, ३ (२) (व्ही) अंजाजअ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हा नोंद होताच वडवणी पोलिसांनी गुरुवारी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या असून आरोपीला माजलगाव कोर्टासमोर हजर करण्यात आले होते.या घटनेचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव शैलेश गायकवाड हे करत आहेत.

## उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे महाआरोग्य शिबिर

### 17- सप्टेंबर ते 2-ऑक्टोबर दरम्यान- स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

किनवट : महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा व राष्ट्रीय आरोग्य अभियान (एन एच एम) अंतर्गत आदिवासी भागातील रुग्णांसाठी उपजिल्हा रुग्णालय गोकुंदा येथे भव्य मोफत ऑपरेशन महाआरोग्य शिबीर दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ०९ ते दुपारी ०२ वाजेपर्यंत तपासणी करून निवड झालेल्या रुग्णांची दिनांक ३० सप्टेंबर ते २- ऑक्टोबर या दरम्यान आवश्यक शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत.वरील शिबीराअंतर्गत स्कील मिक्स सेवेअंतर्गत आरोग्य सेवेतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी व श्री गुरु गोबिंद सिंघ सामान्य रुग्णालय, नांदेड येथील सर्व विशेष तज्ञ डॉक्टर्स दि.२९-सप्टेंबर रोजी




तपासणी साठी उपलब्ध राहणार आहेत. शिबीरात हायड्रोसील (अंडवृध्दी), हर्निया, अपेन्डीक्स, शरीरावरील सर्व गाठीचे शस्त्रक्रिया व दंतचिकित्सा औषधोपचार मोफत करण्यात येतील.३५ वर्षावरील सर्व महिलांचे गर्भाशयमुख व स्तन कॅन्सर तपासणी व उपचार.मानसिक आजार तपासणी व उपचार दंत चिकित्सा व उपचार BP, Sugar, HT, NCD Programme सिकलसेल तपासणी रक्तदान शिबीर सर्व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची असांसर्गजनिक रोग तपासणी (Bp, Sugar, HT) रुग्णांचे एक्स-रे, ई.सी.जी., सोनोग्राफी व रक्त तपासणी CT Scan मोफत करण्यात येईल.शस्त्रक्रिया गृह हे सुसज्ज व सर्व सोयीयुक्त असुन तेथे ऑपरेशन थियटरमध्ये नांदेड जिल्ह्यातील नामांकित सर्जन व भुलतंज्ञांच्या देखरेखीखाली शस्त्रक्रिया करण्यात येईल.ऑपरेशनसाठी लागणारे औषधोपचार मोफत करण्यात येईल.तसेच एच.एल.एल महालॅब्सद्वारे रक्तातील सर्व तपासणी मोफत करण्यात येणार आहेत. किनवट व परिसरातील गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.दत्ता केंद्रे यांनी केले आहे.

# संपादकीय

## नॉन-स्टिकभांड्यांमध्ये स्वयंपाक करताय? आजच व्हा सावध... का? घ्या जाणून



गेल्या काही वर्षांपासून नॉनस्टिक कुकवेअरमध्ये स्वयंपाक करणे हा एक ट्रेंड बनला आहे. नॉनस्टिक कुकवेअर आता घरांमध्ये एक सामान्य वस्तू आहे. या भांड्यांमध्ये तेल देखील कमी लागतं चिकटल्याशिवाय कमी तेलात अन्न शिजवतं. या कुकवेअरवर पॉलीटेट्राफ्लुरोइथिलीन (PTFE) चे धातूचं आवरण असतं. ज्यामुळे अन्न भांड्याला चिटकत नाही. हेच कारण आहे की लोक नॉनस्टिक कुकवेअर निवडत आहेत. नॉन-स्टिक भांड्यांचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. असा दावाही करण्यात आला आहे की नॉन-स्टिक भांड्यांमध्ये शिजवलेलं अन्न खाल्ल्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. नॉन-स्टिक भांड्यांमध्ये स्वयंपाक करणं आरोग्यासाठी हानिकारक का आहे आणि त्यामुळे कोणते नुकसान होऊ शकते हे तज्ज्ञांकडून जाणून घेऊया. याशिवाय, नॉन-स्टिक भांडं वापरताना कोणती खबरदारी घ्यावी. नॉन-स्टिक कुकवेअर हानिकारक का आहे?: इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) ने अलीकडेच भारतीयांसाठी एक मार्गदर्शक तत्व जारी केली आहे, ज्यामध्ये त्यांना नॉन-स्टिक कुकवेअरमध्ये अन्न शिजवू नये असा सल्ला देण्यात आला आहे. त्यात म्हटलं आहे की जर तुम्ही नॉन-स्टिक भांड्यांमध्ये जास्त वेळ अन्न शिजवलं तर त्यात असलेलं टेफ्लॉन शरीरात प्रवेश करतं. यामुळे विविध आरोग्य समस्या उद्भवू शकतात. नॉन-स्टिक भांड्यांमध्ये पॉलीटेट्राफ्लोरोइथिलीनचा लेप असतो, ज्याला टेफ्लॉन असंही म्हणतात. जेव्हा कुकवेअर उच्च तापमानाला गरम केलं जातं तेव्हा टेफ्लॉनमधील रसायने बाहेर पडतात आणि अन्नात मिसळतात. यामुळे वंध्यत्व आणि हृदयाचे आरोग्य तसेच लोहाची कमतरता यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.

या गोष्टी लक्षात ठेवा

जर तुम्ही नॉनस्टिक पॅन, भांडी वापरत असाल तर काही गोष्टी लक्षात ठेवणं खूप महत्वाचे आहे. नेहमी प्रतिष्ठित ब्रँडचे नॉनस्टिक पॅन खरेदी करा. नॉनस्टिक पॅनसाठी लाकडी किंवा सिलिकॉन चमचे वापरा. स्टीलच्या चमच्याने लेप निघून जातो, ज्यामुळे तो अधिक धोकादायक बनतो. जर लेप झिजला असेल तर पॅन बदलणं चांगलं.

# एस.पी. साहेब, पाटोद्यात नेमकं चाललंय तरी काय? पोलीस संख्येत वाढ होऊनही गुन्हेगारी कमी होईना गुन्ह्यांच्या सलग घटनेने नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण

पाटोदा (प्रतिनिधी) पाटोदा तालुक्यातील नागरिक सलग घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांमुळे अस्वस्थ झाले आहेत. अलिकडच्या काळात थेरला येथे दरोडा, पारनेर येथे चाकूहल्ला, तर बेलेवाडीत तलवार सापडल्याची घटना घडली. या सलग प्रकारांनी तालुक्यात असुरक्षिततेची भावना वाढत चालली आहे.पोलीस संख्या वाढली, पण परिणाम शून्य गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांची संख्या वाढविण्यात आली आहे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत त्याचा काहीही परिणाम दिसून आलेला नाही. गुन्ह्यांचे प्रमाण कमी न होता दिवसेंदिवस वाढतेच आहे. त्यामुळे नागरिकांचा संताप व्यक्त होत असून प्रशासनाच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मुख्यालयात वास्तव्यास राहण्याचे आदेश तरीही बाहेरगावाहून ये-जा पोलिस कर्मचाऱ्यांना पाटोदा मुख्यालयात वास्तव्यास राहण्याचे आदेश आहेत. मात्र, प्रत्यक्षात बहुतांश पोलीस कर्मचारी बाहेरगावाहून रोज ये-जा करत असल्याचे चित्र समोर आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये चर्चेला उधाण आले आहे.अचानक गंभीर घटना घडल्यास तातडीने




पोलीस घटनास्थळी पोहोचतील का? हा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.गुन्हेगारीवर नियंत्रण आणण्यासाठी नागरिक, सामाजिक संघटना आणि स्थानिक नेते यांच्याकडून एकमुखाने मागणी होत आहे की तालुक्यात गस्त मोठ्या प्रमाणावर वाढवावी. मुख्यालयात वास्तव्यास राहण्याच्या आदेशांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी.गंभीर गुन्ह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करून नागरिकांचा विश्वास परत मिळवावा.पाटोदा तालुक्यातील घटना केवळ वेगळ्या नव्हेत, तर सलग घडत आहेत. त्यामुळे प्रशासनाने फक्त आकडेवारी सांगून नागरिकांची बोळवण न करता प्रत्यक्ष कामगिरी दाखवणे गरजेचे आहे. अन्यथा कायदा व सुव्यवस्था ढासळेल आणि सामान्य माणूस असुरक्षिततेच्या विळख्यात अडकून बसेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# शरद ऋतूत निरोगी राहण्याचा आयुर्वेदीय मंत्र

आयुर्वेद शास्त्रामधे काळानुसार निसर्गात होणाऱ्या बदलांचा अशुभ परिणाम शरीरावर कमी व्हावा , कि ज्याच्यामुळे स्वस्थ टिकून ठेवले जाईल , असे काही नियम सांगितले आहेत. यांमध्ये काय करावे व काय करु नये याचा उल्लेख खालील प्रमाणे केलेला आहे.

**हे करावे**

* गोड, कडू व तुरट रसाचे पदार्थ खावेत (डाळिंब, द्राक्ष, उस, तांदूळ, मूगडाळ, गहू).
* शुद्ध तूप, दूध, तूपयुक्त हलका आहार घ्यावा.
* थंड पाणी, नारळपाणी, साखरपाणी यांसारखे शीतल पेय घ्यावे.
* चंद्रप्रकाशात, थंड बागेत फेरफटका मारणे लाभदायी.
* लवकर झोपून लवकर उठावे.
* डोळे, कान, त्वचा थंड पाण्याने धुवून ठेवावीत.
* योगामध्ये -शीतली, शीतकारी, अनुलोम-विलोम प्राणायाम करावा.
* आयुर्वेदिक विरेचन , रक्त मोक्षण (शुद्धीकरण उपचार) या ऋतूत करणे अत्यंत फायदेशीर.

**हे करू नये**

* आंबट, तिखट, खारट व तेलकट पदार्थ टाळावेत.
* दारू, मद्यपान, फार मसालेदार व तळलेले पदार्थ घेऊ नयेत.
* उन्हात दीर्घकाळ फिरणे, श्रम करणे टाळावे.
* रात्रभर जागरण करू नये.
* राग, चिडचिड व मानसिक ताण घेणे टाळावे.




* गरम पाणी, गरम पेय व फार उष्ण आहार घेऊ नये.

शरद ऋतूचे- शरीरातील परिणाम: पित्त वाढणे, त्वचारोग, डोकेदुखी, आम्लपित्त, उष्णता सहन न होणे . म्हणून योग्य आहार, विहार आणि पंचकर्म पद्धती अंगीकारल्यास आरोग्य उत्तम राहते. "करावे-करू नये" या सोप्या नियमांनी शरद ऋतूत रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि मन प्रसन्न राहते. शास्त्रोक्त चिकित्सा व पंचकर्म व इच्छित संतती प्राप्ती साठी मार्गदर्शन या साठी आजच आपल्या श्री नारायण आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटरला भेट द्या. पत्ता : मुक्ताई प्लाझा रेणु हॉस्पिटल समोर शिवाजी धांडे नगर बीड. संपर्क : 9145742416

# समाजाभिमुख पत्रकारितेचा ध्यास : मा. गोकुळजी इंगोले

पत्रकारिता ही केवळ बातमी देण्याची साधी प्रक्रिया नसून ती समाजाला दिशा देणारी, प्रेरणा देणारी आणि न्यायाची बाजू मांडणारी एक प्रभावी शक्ती आहे. या शक्तीचा उपयोग समाजहितासाठी करणारे आणि आपल्या लेखणीद्वारे सामान्य माणसाचा आवाज बुलंद करणारे नाव म्हणजे मा. गोकुळजी इंगोले. गावोगाव भटकंती करताना त्यांनी छोट्या-छोट्या व्यवसायिकांच्या जीवनकथा समाजासमोर आणल्या. हॉटेल, चहा टपरी यांसारख्या छोट्या धंद्यातून आपला संसार उभा करणाऱ्या माणसांची कहाणी त्यांनी शब्दांत रंगवली. प्रगतिशील शेतकऱ्यांच्या अनुभवातून शेतीकडे नवा दृष्टीकोन देण्याचे काम त्यांनी केले. त्यांच्या लेखणीमधून मांडलेला प्रत्येक अनुभव वाचकाला भावणारा आणि प्रेरणादायी ठरला. केवळ पत्रकारिता करण्यासाठी नव्हे तर समाजाला दिशा देण्यासाठी त्यांनी हा प्रवास सुरू केला आणि म्हणूनच त्यांची प्रत्येक बातमी, प्रत्येक शब्द सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडलेला वाटतो.



या प्रामाणिक प्रयत्नांचा परिणाम असा झाला की, गोकुळजी इंगोले यांना पत्रकारिता क्षेत्रात अनेक मानाची पदे लाभली. आज ते बीड टाइम्स आणि दैनिक लोकआरंभ या वृत्तपत्रांचे संपादक म्हणून कार्यरत आहेत. डिजिटल मीडिया, पाटोदा येथील कार्यकारिणी तालुकाध्यक्ष या पदावरूनही ते प्रभावी कामगिरी करत आहेत. एवढ्यावरच न थांबता त्यांनी "आपला बळीराजा" या प्रतिष्ठानची स्थापना करून सामाजिक उपक्रमांची नवी वाट उघडली. शेतकऱ्यांच्या समस्या, तरुणाईची स्वप्ने आणि समाजातील वंचित घटकांच्या गरजा ओळखून त्यांनी राबवलेले उपक्रम खरोखरच कौतुकास्पद ठरले. त्यांचा हजरजबाबी आणि मनमोकळा स्वभाव लोकांना लगेच आपला वाटतो. शिरूर, बीड, माजलगावसारख्या अनेक भागांत त्यांचा मोठा मित्रपरिवार निर्माण झाला आहे. कौटुंबिक जबाबदारी पार पाडताना त्यांनी आपल्या लहान भावाला देशसेवेसाठी आर्मीमध्ये पाठवले, तर स्वतः समाजकारण आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात अविरतपणे कार्य करत राहिले. गोकुळजी इंगोले हे फक्त पत्रकार नाहीत, ते समाजातील प्रत्येक घटकाचा आवाज आहेत. त्यांची लेखणी म्हणजे समाजाच्या मनातील भावना मांडणारा आरसा आहे. त्यांचा प्रवास प्रत्येक तरुणाला जिद्द, चिकाटी आणि समाजसेवेची प्रेरणा देणारा आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांच्या आयुष्यात उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि अखंड कार्यशक्ती लाभो. समाजहितासाठी घेतलेला त्यांचा ध्यास असाच यशस्वीपणे पुढे चालू राहो हीच मंगलकामना.

**रविंद्र हातागळे**
**सचिव आर्या सामाजिक प्रतिष्ठान, बीड**

# नांदेड जिल्ह्यातील ऑगस्ट अखेरील सर्व बाधित शेतक-यांना १०० टक्के मदत निधी मंजुर

## सोमवारपासून प्रत्यक्षात ५५३ कोटी ४८ लाख ६२ हजारांचा निधी वितरणाला सुरुवात होणार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : नांदेड जिल्हा अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्तीमुळे एकूण बाधित पीक क्षेत्राच्या प्रमाणात १०० नुकसान भरपाई मिळवणारा राज्यात पहिला जिल्हा ठरला आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या जिल्ह्यातील या शेतकऱ्यांसाठी १०० टक्के मदत निधी मंजुर करण्यात आला आहे. शासनाने तिसऱ्या टप्यात नांदेडसाठी ५५३ कोटी ४८ लाख ६२ हजारांचा निधी मंजुर केला आहे. तर खरडून गेलेल्या व गाळयुक्त जमिनींसाठी २० कोटी ८१ लाखांचा निधी दिला जाणार आहे. पीक नुकसानग्रस्त शेतक-यांच्या याद्या पोर्टलवर अपलोड करण्याचे काम विशेष मोहीमेव्दारे सुरु असून मंजुर करण्यात आलेला निधी सोमवारपासून थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात होणार आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात शेती पिकाचं झालेलं शेतकऱ्यांचं नुकसान भरून निघणार आहे.अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज नांदेड जिल्ह्यातील अर्धापूर तालुक्याच्या पिंपळगावला भेट देत बाधित क्षेत्राची पाहणी केली. यावेळी कृषीमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. त्यासोबत सरकारने शेतकऱ्यांसाठी मंजूर केलेल्या निधीबाबत माहिती देऊन, सरकार शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास दिला. नांदेड जिल्ह्यात



अतिवृष्टीमुळे आतापर्यंत ६४८,५३३.२ हेक्टर क्षेत्राचा नुकसान झालं आहे. यात जवळपास ७,७४,३१३ शेतकऱ्यांना अतिवृष्टीमुळे नुकसान झालं आहे. जिल्ह्यातील एकूण खरीप हंगाम पेरणी क्षेत्रापैकी अतिवृष्टी व सततचे पाऊसमानामुळे ८६ टक्के क्षेत्रावरील पीके बाधित होऊन नुकसान झालेली आहेत. जिल्हा प्रशासनाने या क्षेत्रावरील पीक व शेत जमीन नुकसानीचे पंचनामे अंतिम केलेले असून त्यानुसार सादर केलेल्या प्रस्तावात एकूण ५७४ कोटी २९ लाख ४३ हजार रुपयांच्या निधीची मागणी केली होती. नांदेड जिल्हा अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्तीमुळे एकूण बाधित पीक क्षेत्राच्या प्रमाणात १०० नुकसान भरपाई मिळवणारा राज्यात पहिला जिल्हा ठरला आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी नांदेड जिल्हा दौऱ्यादरम्यान दिलेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अर्धापूर, नांदेड, मुदखेड, कंधार, लोहा, मुखेड, देगलूर, बिलोली, धर्माबाद, नायगाव, किनवट, माहूर, हदगांव, ही. नगर, भोकर आणि उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे प्रामुख्याने खरीप हंगामातील जिरायत, बागायत आणि फळ पिकांना मोठा फटका बसला. यात सोयबीन, कापूस, तूर, मुग, उडीद, ज्वारी, भाजीपाला, हळद आणि केळी पिकांचं मोठं नुकसान झालं. त्यांचसोबत खरडून गेलेल्या व गाळ साचलेल्या जमिनीसाठी एकूण २०.८१ कोटी निधी देण्यात येणार आहेत.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २१ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## आता भारतीयांना मोजावे लागणार तब्बल 8 कोटी, ट्रम्प यांनी आणलं नवं गोल्ड कार्ड!




अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संपूर्ण जगालाच अचंबित करणारा निर्णय घेतला आहे. त्यांनी H-1B व्हिसाच्या शुल्कात मोठी वाढ केली आहे. हे शुक्ल तब्बल 88 लाखांपर्यंत वाढवण्यात आले आहे. म्हणजेच भारतीय व्यक्तीला अमेरिकेत जाऊन नोकरी करायची असेल तर H-1B व्हिसा मिळावा यासाठी अगोदर त्या व्यक्तीला तब्बल 88 लाख रुपये मोजावे लागणार आहेत. अन्य देशांसाठीदेखील ही शुल्कवाढ लागू आहे. दरम्यान ट्रम्प यांच्या या शुल्कवाढीमुळे संपूर्ण जगाचा ताण वाढलेला असताना आता दुसरीकडे ट्रम्प यांच्या यांच्या 'ट्रम्प गोल्ड कार्ड'ची सगळीकडे चर्चा होत आहे. या कार्डच्या मदतीने आता अमेरिकेत राहता येणार आहे. या गोल्ड कार्डमुळे आता अमेरिकेत...

अमेरिकेत प्रत्येक वर्षी लॉटरी पद्धतीने साधारण 85 हजार H-1B व्हिसा वितरित केले जातात. यातील साधारण तीन-चुतर्थांश व्हिसा भारतीयांना मिळतात. मात्र आता ट्रम्प यांनी H-1B व्हिसा मिळवण्यासाठीच्या शुल्कात वाढ केली आहे. ही वाढ तब्बल 1 लाख डॉलर्स आहे. सोबतच ट्रम्प यांनी एक नवी व्हिसा प्रणाली चालू केली आहे. या याला द गोल्ड कार्ड असे नाव देण्यात आले आहे. हे कार्ड परदेशी लोकांसाठी असेल. जी व्यक्ती अमेरिकेत राहून काम करू इच्छीते, त्या व्यक्तीसाठी हे द गोल्ड कार्ड मदतीला येईल. ट्रम्प यांनी गोल्ड कार्डविषयी त्यांचे मत व्यक्त केलेले आहे. "या गोल्ड कार्डमुळे आता अमेरिकेत अब्जो डॉलर्स येतील. हेच पैसे कंपन्या तज्ज्ञ लोकांना कामावर ठेवण्यासाठी वापरू शकतील," असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. व्हाईट हाऊसने दिलेल्या माहितीनुसार द गोल्ड कार्ड हे यशस्वी उद्योजक, गुंतवणूकदार यांना मिळेल. हेच कार्ड भविष्यात ग्रीन कार्डची जागा घेईल, असेही आता सांगितले जात आहे. कोणाला मिळणार गोल्ड कार्ड? मिळालेल्या माहितीनुसार जो कोणी अर्ज करेल त्याला अगोदर नॉन रिफंडेबल (परत न मिळणारी) फी भरावी लागेल. गोल्ड कार्ड मंजूर झाल्यावर अर्जदाराला 1 अब्ज डॉलर्स म्हणजेच साधारण 8.3 कोटी रुपये अमेरिकन सरकारकडे जमा करावे लागतील. त्यानंतर अमेरिकन सरकारतर्फे संबंधित अर्जदाराला हे गोल्ड कार्ड दिले जाईल. या कार्डच्या मदतीने संबंधित व्यक्ती अमेरिकेतली सर्व 50 राज्यांत वास्तव्य करू शकते.

ट्रम्प प्लॅटिनम कार्ड काय आहे?

प्लॅटिनम कार्ड हे उद्योगपती, गुंतवणूकदारांना मिळणार आहे. या कार्डचे गोल्ड कार्डपेक्षा जास्त फायदे असतील. या कार्डसाठीची नोंदणी अद्याप सुरू झालेली नाही. हे कार्ड मंजूर झाल्यास तुम्हाला अमेरिकन सरकारकडे 5 दशलक्ष म्हणजेच साधारण 41.5 कोटी रुपये जमा करावे लागतील. या कार्डच्या मदतीने तुम्हाला अमेरिकेत 270 दिवस वास्तव्य करता येईल. या काळात तुम्हाला अमेरिकेत प्राप्तिकर भरावा लागणार नाही.

कॉर्पोरेट कार्ड काय आहे?

ज्या कंपन्यांना परदेशी कर्मचारी कामावर ठेवायचे आहेत, त्या कंपन्यांसाठी हे कार्ड आहे. या कार्डचे शुल्क साधारण 2 दशलक्ष म्हणजेच 16.6 कोटी रुपये प्रति कर्मचारी असेल. कंपनीला प्रत्येक कर्मचाऱ्यासाठी नॉन रिफंडेबल फी द्यावी लागेल. या कार्डसाठी वार्षिक मेन्टेनन्स फी तसेच ट्रान्सफर फीदेखील लागेल.

# सुट्टीच्या दिवशी तहसीलदार शेळके यांची रामनगरला भेट ; तलाव दुरुस्ती व मोफत वाळूचे आश्वासन



## घरकुल लाभार्थ्यांना दिलासा

सध्या पंतप्रधान आवास योजनेसह इतरही योजनांद्वारे मोठ्या प्रमाणात घरकुल मंजूर करण्यात आले आहेत . मात्र वाळूघाट बंद असल्याने वाळू मिळत नाही . शासनाने घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास मोफत वाळू देण्याची घोषणा केली आहे . त्या अनुषंगाने रामनगर येथील लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून देण्यासाठी स्वतः प्रयत्न करेल , असे आश्वासन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिले . सत्तेच्या आसनावर जेव्हा जनसेवेची सावली उभी राहते ,तेव्हा अधिकारी नाही तर लोकांचा सोबती बनून तो गावोगावी जातो .

आज तलावाच्या पाण्यातली उमेद आणि मोफत वाळूच्या वचनातली आशा ,
रामनगरच्या ग्रामस्थांच्या डोळ्यांत नवीन स्वप्नांचे दीप लावून गेली आहे .

.तालुक्यातील रामनगर येथील पाझर तलाव नुकत्याच झालेल्या पावसामुळे पूर्णपणे भरून ओव्हरफ्लो झाला आहे . तलावाच्या भिंतींवर झाडे – झुडपे वाढल्यामुळे गळती होण्याचा व निर्माण झाला आहे . या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी तहसीलदारांना निवेदन दिले होते .शनिवार हा सुट्टीचा दिवस असूनही तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी रामनगरला भेट देऊन तलावाची पाहणी केली . त्यांनी भिंतीवरील झाडे – झुडपे तातडीने काढून दुरुस्तीचे काम हाती घेण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले .तहसीलदार शेळके यांची ही भेट म्हणजे रामनगर गाव वसल्यापासूनची पहिलीच भेट ठरली . त्यांच्या सोबत मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ , ग्रामसेवक गहिनीनाथ मिसाळ उपस्थित होते . जिरेवाडी व रामनगर ग्रामस्थांच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी सरपंच सर्जेराव मोहिते , उपसरपंच निलेश मोहिते , पत्रकार केशव कदम , रामभाऊ मोहिते , अशोक सुरवसे , कृष्णा मोहिते , अशोक मोहिते , रामनाथ चव्हाण , त्रिंबक चव्हाण , सुरेश पिंपळे , मारोती मोहिते , नामदेव चव्हाण , कल्याण ढेरे , शिवराज सुरवसे , सुनिल कदम , बाबुतात्या मोहिते , जालींदर लोमटे , राहुल ढेरे , गणेश घोडके , कांताराम दळवी , बाळू चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते .

# गोवा येथील २५ मीटर स्टॅंडर्ड पिस्तोल शुटिंग स्पर्धेत श्री महालक्ष्मी विद्यालयाच्या चि. तानाजी काळेचे सुयश!

## सर्वस्तरातून अभिनंदनाचा होतोय वर्षाव..!



बीड दि.२०(प्रतिनिधी)-गोवा येथे झालेल्या राष्ट्रीय रायफल/पिस्तोल शुटिंग स्पर्धा 25 मीटर स्टॅंडर्ड पिस्तोल या स्पर्धेत शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तानाजी सुभाष काळे याने सीनियर गटात तिसरा क्रमांक आणि ज्युनियर गटात चौथा क्रमांक मिळवला. त्याच्या या यशाबद्दल त्याच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

बीड शहरापासून जवळ असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या तानाजी सुभाष काळे या विद्यार्थ्यांस पिस्तोल शुटिंगची लहानपणापासून आवड आहे. ही आवड जोपासण्यासाठी तो सातत्याने धडपड करत आहे. तो दररोज सराव करून या स्पर्धेत अधिक निपुण होण्यासाठी तो प्रयत्नशील असतो. त्याने आता पर्यंत विविध स्पर्धासह शालेय स्तरावरील स्पर्धेत तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर पिस्तोल शुटिंग स्पर्धेत भाग घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. नुकतेच गोवा येथे राष्ट्रीय रायफल/पिस्तोल शुटिंग स्पर्धा 25 मीटर स्टॅंडर्ड पिस्तोल स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत चि. तानाजी सुभाष काळे सहभागी झाला होता. या स्पर्धेत त्याने सीनियर गटाच्या स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळविला तर ज्युनियर गटात चौथा क्रमांक मिळवला आहे. त्याच्या या यशाबद्दल त्याचे शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष गणेश वाघ सर, सचिव नामदेव वाघ सर, शाळेचे मुख्याध्यापक चव्हाण सर, वाव्हळ सर, श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप मॅडम गुजर सर यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, त्याचे आईवडील, नातेवाईक आणि मित्र परिवारांनी त्याचे अभिनंदन करून त्यास पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# आय लव्ह मोहम्मद यूपी मधील कानपूर घटनेच्या निषेधार्थ बीडमध्ये आंदोलन

## प्रॉफेट मोहम्मद साहेबांवर आमच सगळं कुरबान - ॲड शेख शफीक भाऊ

### लवकरच मोठे आंदोलन.मुफ्ती मोहीय्योद्दीन, जहीर कादरी, सय्यद आबेद यांची उपस्थिती

बीड: प्रतिनिधी उत्तर प्रदेश मधील कानपूर शहरांमध्ये आय लव्ह मोहम्मद च्या नावाचे पोस्टर लावल्या मुळे तिथल्या 24 युवकांवर उत्तर प्रदेश सरकारच्या दबावाखाली पोलीस प्रशासनातर्फे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचे पडसाद पूर्ण भारतामध्ये चालू झाले. मुस्लिम समाजाच्या भावना दुखल्या कारण प्रॉफेट मोहम्मद साहेबांचे नावाचे पोस्टर लावल्यामुळे जर गुन्हा दाखल होत असेल तर भारतामध्ये मुस्लिम समाजाच्या बाबतीत उत्तर प्रदेश सरकारची भूमिका व पोलिसांची भूमिका ही दुय्यम नागरिकत्वाची दिसून येते. याची नाराजगी पूर्ण भारतामध्ये मुस्लिम समाज ने विविध माध्यमांतून आंदोलनाच्या झाले असे दिसून येते. 2014 भाजप सरकार आल्यापासून मुस्लिम समाजाच्या प्रॉफेट मोहम्मद साहेब, यांच्या बाबतीत जाणून-बुजून



हिंदुत्ववादी कट्टरवादी लोक जे की त्यांना हिंदू मुस्लिम एकता मध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. ते प्रत्येक वेळेस असेच काहीतरी



कृत्य करते व त्यामध्ये आता भर पडली आहे उत्तर प्रदेश पुलिस प्रशासनाची ही मानसिकता तसेच दिसून येते कारण की जर मोहम्मद साहेबांचे पोस्टर लावल्यामुळे जर गुन्हा दाखल होत असेल हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला दिलेल्या संविधानाची पायमल्ली करत आहे. त्याच आर्थी बीड मधल्या बशीरगंन चौकामध्ये शुक्रवारच्या नमाज नंतर हे एम आय एम पक्षातर्फे आंदोलन करण्यात आले. आणि घोषणा देण्यात आल्या यावेळी मुफ्ती मोहीय्योदीन साहेब, केजीएन चे जहीर कादरी साहेब, SDPI चे सय्यद आबेद यांनी मार्गदर्शन केले. यावेळी खन्ना भैय्या, नगरसेवक शेख मतीन, जेष्ठ नेते सलाम शेठ, हाफीज मोहसीन साहेब , हमीद पालेखान, अखील भाई, इलियास भाई, शेख मुदस्सीर ,साजन चौधरी, शेख सलमान, फहाद चाऊस, रेहान भाई, बासेद भाई , अतीक भाई , सफी दादा, सोहेल शिकलकर आदी मोठ्या संख्येने बीड शहरातील नागरिक उपस्थित होते.

# विषाणू संसर्ग शरीरास अपायकारक डॉ. सुनील वैद्य

माजलगाव प्रतिनिधी दिनांक 20 सप्टेंबर 2025 विषाणू संसर्ग शरीरास अपायकारक असल्याचे प्रतिपादन डॉ. सुनील वैद्य यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव चा विज्ञान मंच विभाग व विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "ओळख भारतीय ज्ञान विज्ञान परंपरेची" या सहा दिवसीय व्याख्यानमालेच्या सहाव्या दिवशीच्या समारोपसत्रा प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था पुणे यांनी आजपर्यंत जे कार्य केले आहे ते खूप अद्वितीय असे आहे. कारण कोरोना काळामध्ये कमी कालावधीमध्ये लस निर्माण करून अनेक लोकांचे जीव वाचवण्याचे काम या संस्थेने केले. म्हणून त्यांचे कार्य देशभरामध्ये आदर्शवत कार्य समजले जाते. भारताचे पंतप्रधान माननीय नरेंद्र मोदी यांनी देखील या संस्थेला आर्थिक तसेच मानसिक प्रोत्साहन देऊन या संस्थेचा गौरव वाढवला व येथील शास्त्रज्ञांना विषाणूजन्य आजाराविषयीच्या वेगवेगळ्या लशी शोधून काढण्याविषयी प्रोत्साहन दिले. या संस्थेची आजपर्यंतची परंपरा ही अतिशय वाखाणण्याजोगी अशी आहे. गेले 73 वर्षाच्या काळामध्ये अनेक साथीच्या रोगावर व विषाणूजन्य आजारावर या संस्थेने संशोधन करून अनेक किट्स व लशी शोधून काढल्या. लाखो साथीचे रोग अभ्यासले, त्यात विविध प्रकारचे करोडो नमुने तपासले, विषाणू रोगासाठी सर्वेक्षणे केली. कित्येक विषाणूंचा शोध लावला व त्यांना जतन करून ठेवले. कित्येक निदान पद्धती शोधून काढल्या. तपासणीमध्ये लाखो वेगवेगळ्या लशी निर्माण करून त्याचा फायदा सर्वसामान्य लोकांना करून दिला. चिकनगुनिया, डेंगू, जपानी मस्तिष्क ज्वर,वेस्ट नाईल ज्वर, रेबीज, कावीळ, अतिसार (रोटा), शीतज्वर, जर्मन गोवर, एड्स यासारख्या विषाणूजन्य रोगावर एन.आय.व्हि. मार्फत भरपूर काम भारतभर झाले आहे व यापुढे होत राहील अशा आशावादी त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे समाधानीही त्यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांनी केले. प्रास्ताविकामध्ये त्यांनी या सहा दिवशीय व्याख्यानमालेच्या आयोजना पाठीमागची भूमिका विशद केली. तसेच प्रमुख पाहुण्यांचा परिचय ही करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रेमनंदा घडसिंग यांनी केले तर आभार विज्ञान मंच समन्वयक डॉ. विकास बोरगावकर यांनी मानले.

या कार्यक्रमास भा.शि.प्र.संस्थेतील अनेक संस्कार केंद्रातील विद्यार्थी ऑनलाईन तसेच श्री सिद्धेश्वर महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांची ऑफलाइन उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार २१ सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# आ.संदीप भैय्यांकडून सलग दुसऱ्या दिवशी अतिवृष्टीची पाहणी; विविध ठिकाणी पाहणी करत शेतकऱ्यांना दिला धीर

## शिरूर (का) महसूल मंडळात झालेल्या नुकसानीची सरसकट नुकसान भरपाई द्या

बीड (प्रतिनिधी):- अतिवृष्टीमुळे शिरूर (का) तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून आ.संदीप क्षीरसागर यांनी नुकसान झालेल्या विविध ठिकाणी पाहणी करत शेतकऱ्यांना सरसकट भरपाईची मागणी केली. मागील काही दिवसांपासून बीड आणि शिरूर (का) सातत्याने पाऊस पडत असून अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. त्यापैकी शुक्रवारी बीड तालुक्यातील नुकसान झालेल्या ठिकाणी शुक्रवारी संदीप क्षीरसागर यांनी जाऊन पाहणी केली होती. आज त्यांनी शिरूर (का) तालुक्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या हिवरसिंगा येथील कॅनॉल रोड, रोकडेश्वर नगर, बरगवाडी, घुगेवाडी, रौंद वस्ती (खरगवाडी), धनगरवाडी,कस्पटेवस्ती, कैतके वस्ती खालापुरी, भानकवाडी (वरची) या ठिकाणी जाऊन नुकसानीची पाहणी केली. शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचलेलं पाहावयास मिळाले. असे वाटत होते की ते शेत नसून लहानसं तळं तयार झालंय. कुठे माती वाहून गेल्यामुळे शेत नुसतंच उघडं पडलेलं आहे. कुठे उभं पीक डोळ्यासमोर पाण्याखाली जाऊन नष्ट झालं आहे. बीड मतदारसंघातील खोकरमोहा ता. शिरूर कासार येथील शेतकरी बांधवाशी संवाद साधला. त्यांच्या समस्या, दुखः समजून घेतले. यावेळी मुख्य रस्ता तयार करण्यासाठी मागणी झाली,



नदीवारील नविन पुल बांधकाम करणे, बंधारा दुरूस्त करणे, वस्तीवरील रस्त्याचे काम थांबलेले आहे ते पुन्हा सुरू करणे व जायकवाडी क्रं 3 च्या तलावाची दुरूस्ती पाहणी करून लवकरच या बाबतीत कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन दिले. याठिकाणच्या गावातील झालेल्या शेतकरी बांधवांच्या पीक नुकसानीचे, सार्वजनिक मालमत्तेचे व इतर ठिकाणचे बीड विधानसभेचे आ. संदीप क्षीरसागर यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शासनाकडे बीड आणि शिरूर का तालुक्यातील सर्व महसूल मंडळात झालेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी देखील केली. बीड विधानसभा मतदारसंघात शिरूर तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन चे पिक अक्षरशः पाण्यात गेले आहे. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नुकसान पाहणी वेळी प्रत्यक्ष प्रशासनाला तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच शेतकऱ्यांना कसलाही विलंब न लावता सरसकट आर्थिक मदत द्यावी. शेतकरी बांधवांना न्याय मिळेपर्यंत प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

### संदीप भैय्या आम्हाला नुकसान भरपाई द्या; शेतकऱ्यांच्या डोळ्यातले पाणी मन हेलावून टाकणारे

मागील काही दिवसांपासून बीड तालुक्यात सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यांच्या शेतात जाऊन नुकसानीची पाहणी केली. त्यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. पावसामुळे झालेल्या नुकसानीची माहिती देताना त्यांच्या डोळ्यातले पाणी सर्व काही सांगून जात होते. संदीप भैय्या आम्हाला आर्थिक मदत मिळवून द्या, या नुकसानीतून वाचवा असा टाहो फोडताना शेतकऱ्यांच्या डोळ्यातले पाणी मन हेलावून टाकणारे होते.

# केज पंचायत समितीचा निर्ढावलेला ग्रामसेवक लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

केज: मंजूर घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी एनओसी देण्यासाठी पाच हजार रुपये लाचेचे डिमांड करुन दोन हजार रुपयांची लाच स्वीकारताना केज पंचायत समिती अंतर्गत केकत सारणी येथे कार्यरत असलेल्या ग्रामसेवकाला बीडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले असून, केज पंचायत समितीमधील पद सिद्ध कर्मचारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या लाचखोरीचा हा प्रकार यानिमित्ताने उघडकीस आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, केज पंचायत समिती अंतर्गत केकत सारणी ग्रामपंचायतीला कार्यरत असणारे ग्रामसेवक सुरेश ठोंबरे रा. सारणी(सांगवी) यांनी घरकुलाचा लाभधारकाकडून घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र लागते म्हणून या कामासाठी पाच हजार रुपयांची लाच मागितली होती. या कर्मचाऱ्याने लाच देण्यास नकार देत याबाबत बीडच्या एसीबीकडे तक्रार केली. तक्रारीची शहानिशा केल्यानंतर, एसीबीच्या पथकाने सापळा रचला. ठरल्याप्रमाणे, शुक्रवारी (दिनांक २०सप्टेंबर) दुपारी संबंधित ग्रामसेवक सुरेश ठोंबरे यांनी लाचेची रक्कम म्हणून दोन हजाराचा पहिला हप्ता स्वीकारत असतानाच एसीबीच्या पथकाने त्याला पंचायत समिती परिसरात रंगेहाथपकडले. या कारवाईमुळे पंचायत समितीत खळबळ उडाली असून, या प्रकरणातील सखोल तपासानंतर आणखी काही धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. एसीबीने या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरु आहे. या घटनेने केज पंचायत समितीच्या प्रशासकीय कामकाजातील भ्रष्टाचाराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. सामान्य नागरिकांना आणि विविध योजनांच्या लाभधारकांना छोटी-म ोठी कामे करूनघेण्यासाठीही लाच द्यावी लागते, असे चित्र या घटनेने समोर आले आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक आनंदराव कडू यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. सदरचीकारवाई छत्रपती संभाजी नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे,शशिकांत शिंगारे, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि छत्रपती संभाजी नगर, बीडचे पोलीस उप अधीक्षक सोपान चिट्टमपल्ले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समाधान कवडे, राहुलकुमार भोळ, सपोउपनि सुरेश सांगळे, पोलीस अंमलदार मच्छिंद्र बीडकर, पांडुरंग काचगुंडे, अनिल शेळके, गणेश म्हेत्रे, संतोष राठोड, अविनाश गवळी, प्रदिप सुरवसे, राजकुमार आघाव, सचिन काळे, अंबादास पुरी, गणेश मेत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सारणी येथील युवकाची आत्महत्या

## (उमरी येथील मुकबधीर निवासी विद्यालय येथे काळजीवाहक पदावर होते कार्यरत)



केज प्रतिनिधी:-केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथील मूळ रहिवासी असलेले अशोक नारायण भंडारे (४२ वर्षे) यांनी दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १० वा. दरम्यान आपल्या सारणी गावातील शेतामध्ये झाडाला दोरी बांधून फाशी घेऊन आत्महत्या केली. ते उमरी (केज) येथील मुकबधीर निवासी विद्यालय येथे गेल्या १७ वर्षापासून १००% वेतनासह काळजीवाहक पदावर कार्यरत होते. ते केज येथे वास्तव्यास होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ, मितभाषी होता. त्यांच्याआला. आत्महत्येचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि दोन मुले असा त्यांचा परिवार आहे. त्यांचा अत्यविधी केज येथील स्मशानभुमी येथे करण्यात



## आमजदोदिन खतिब मक्का मदिना जाताना खतिब परिवाराकडून सत्कार

केज/वार्ताहर:-केज येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापिक हाजी आमजदोदिन मुम्ताजोदिन खतीब आपल्या कुटुंबा सह मक्का मदिना (उमरा)जात आसताना त्यांचे खतीब परिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या

# महाराष्ट्रातील शेतकरी संकटात; सरसकट ओला दुष्काळ जाहीर करा

बीड प्रतिनिधी : राज्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर या दोन महिन्यांत मुसळधार पाऊस झाला आहे. या पावसाचा फटका तब्बल ३० जिल्ह्यांम धील शेतकऱ्यांना बसला आहे. राज्यातील १७ लाख ८५ हजार ७१४ हेक्टर क्षेत्र या पावसाने बाधित झाले आहे. आधीच शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली नाही. त्यात शेतातील पीक देखील हातातून गेले आहे. त्यामुळे बळीराजा अडचणीत सापडला आहे. त्यामुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची आणि शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत जाहीर करण्याची मागणी शेतकरी राजा सामाजिक समितीचे अध्यक्ष रोहित धुरंधरे यांनी केली आहे. या संदर्भात आम्ही शेतकरी राजा सामाजिक समि ती मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोमवारी राज्यभरातून निवेदन देखील सादर करणारा असल्याचे रोहित धुरंधरे यांनी सांगितले. म हाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा आणि इतर जिल्ह्यांत विशेष बीड, हिंगोली, लातूर, सोलापूर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, नांदेड, जिल्ह्यात पावसाने शेतकऱ्यांना अधिक झोडपून काढले असल्यामुळे संपूर्ण राज्यात प्रचंड मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे उभे पीक जमीनदोस्त झाले आहे. कुठे तर पशुधन गेले तर कित्तेक शेतकऱ्यांच्या झालेल्या अतोनात नुकसानीमुळे त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. सद्या राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला असून त्यांना तात्काळ आर्थिक म दत करण्याची गरज आहे. शेतकरी हा अन्नदाता आहे. जगाचा पोशिंदा आहे. या शेतकऱ्याला जर वेळेवर मदत मिळाली नाही तर खरीपासोबत येणारा रब्बी हंगाम देखील धोक्यात येईल. त्यामुळे केवळ निकष आणि पंचानाम्याचा फार्स न लावता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषी मंत्री यांनी तातडीने राज्यातील शेतकऱ्यांना सरसकट ङ्गओला दुष्काळङ्घ जाहीर करून शेतकऱ्यांना किमान प्रति हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याचा निर्णय घ्यावा, अशी कळकळीची मागणी शेतकरी राजा सामाजिक समितीचे अध्यक्ष रोहित धुरंधरे यांनी प्रसार माध्यमाद्वारे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना केली आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका जानेवारीपर्यंत

सर्वोच्च न्यायालयाच्या स्पष्ट शब्दांतील आदेशांनाही केराची टोपली दाखवून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याबाबत चालढकल करणारे राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोग यांना न्यायालयाने कडक शब्दांत फटकारले आहे. येत्या ३१ जानेवारीपूर्वी कोणत्याही परिस्थितीत या निवडणुका घेण्याचा निर्वाणीचा इशारा न्या. सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने दिला; त्यामुळे या मुदतीत निवडणुकांची प्रक्रिया पूर्ण करण्यावाचून पर्याय राहिलेला नाही. चार महिन्यांत या निवडणुका घेण्याचा आदेश न्यायालयाने मे महिन्यातच दिला होता; परंतु सरकार आणि निवडणूक आयोग निवांत राहिले. त्यानंतर बुधवारी झालेल्या सुनावणीतही राज्य सरकारने निवडणुका न घेण्याबाबत अडचणी मांडल्या, तेव्हा खंडपीठाने ‘न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणुका घेण्याच्या मुद्यावर निष्क्रियता आणि विलंब, हे अक्षमतेचे निदर्शक आहे,’ अशा शब्दांत सरकारची कानउघाडणी केली. वर्षभर अभ्यासाकडे ढुंकूनही न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षेपूर्वीच्या आठवड्यात अभ्यासाची धांदल उडते, तद्वतच आता केवळ चार महिन्यांतच राज्यातील २९ महानगरपालिका, २६ जिल्हा परिषदा, २८९ पंचायत समित्या आणि २५७ नगरपालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया पार पाडण्याची वेळ राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगावर आली आहे. करोनाच्या काळात राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आणि त्यांवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली. पुढे विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये इतर मागासवर्ग गटातील (ओबीसी) आरक्षणाच्या मुद्यावरून; तसेच मुंबईतील प्रभागसंख्येवरून न्यायालयीन लढाई सुरू झाली. त्यात काही वर्षांचा कालापव्यय झाल्यानंतर ओबीसी आरक्षणाचा मुद्दा अजूनही अनिर्णित असून, न्यायालयाने त्या आरक्षणास सशर्त मान्यता देऊन निवडणूक घेण्याचा आदेश दिला. मात्र, सरकार आणि राज्य निवडणूक आर्यागाने वेगाने पावले उचलली नाहीत. या संस्थांमधील प्रभागरचनेचे प्रारूप तयार असून त्यावरील हरकतींवर सुनावणीची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, प्रत्यक्ष निवडणुका झाल्या नाहीत. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या ताज्या सुनावणीत राज्य सरकार आणि आयोगाने पुन्हा ‘थांब माझ्या बाळाला तीट लावू दे,’च्या सुरात निरनिराळ्या सबबींचा पाढा वाचला. इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्रांच्या उपलब्धतेबाबतही प्रतिज्ञापत्र सादर करण्याची सूचना केली. प्रभागरचनेचे काम ३१ ऑक्टोबरपूर्वी पूर्ण करा, असा आदेश देऊन, ‘पूर्वीपासून हे मुद्दे ठाऊक असतानाही जाणीवपूर्वक विलंब केला,’ असेही न्यायालयाने सरकारला सुनावले. या परिस्थितीला जबाबदार कोणीही असले, तरी हा सारा घटनाक्रम लोकशाहीला वाकुल्या दाखवणाराच ठरला आहे. त्यामागे प्रथमदर्शनी करोना आणि न्यायालयीन तिढा, ही कारणे दिसत असली, तरी राजकीय सोयीचा मुद्दाही त्यामागे आहे. राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर लोकप्रतिनिधी नसल्याने सर्वसामान्य नागरिकांची कमालीची गैरसोय होत असली, तरी राज्यातील सत्ताधाऱ्यांची मात्र सोयच झाल्याचे दिसते. त्यामुळे या ना त्या कारणाने निवडणुका लांबणीवर टाकल्या गेल्या. यामुळे सर्व शहरांत नोकरशाहीचे राज्य निर्माण झाले आहे. लोकप्रतिनिधींअभावी प्रशासक, म्हणजे मनपा आयुक्त प्रशासनाच्या वतीने प्रस्ताव सादर करतात, स्थायी समितीच्या नात्याने तेच मान्यता देतात आणि सर्वसाधारण सभेचेही अधिकार प्राधान्याला शेवटचे स्थान मिळत आहे. दुसरीकडे दैनंदिन समस्या सोडविणारे लोकप्रतिनिधी नसल्याने त्या सोडविण्यासाठी सर्वसामान्य नागरिक वेगवेगळ्या कार्यालयांचे उंबरे झिजवत आहेत आणि फक्त आपल्या ‘आकां’ना उत्तरदायी असलेली नोकरशाही इतरांना दाद लागू देत नाही. राजकीय नेतृत्वाची नवी पिढी स्थानिक निवडणुकांतून घडते; परंतु निवडणुकांअभावी त्यालाही खीळ बसली आहे. करोनासाथीच्या अपवादात्मक काळात हे ठीक होते; पण आता हाच पायंडा सुरू राहणे लोकशाहीसाठी घातक आहे. त्यामुळे संबंधितांनी तातडीने पावले उचलून या मुदतीत निवडणुका घ्याव्यात आणि न्यायालयाकडून होणारा संभाव्य मुखभंग टाळावा, हेच इष्ट.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com